नागपूर पॅटर्नप्रमाणे समदाबाने पाणी पुरवठा करण्यासंदर्भात इतर जिल्ह्यामध्ये राबविण्यासाठीचा पर्यायांचा अभ्यास करुन शासनास शिफारशी करण्यासाठी अभ्यास गटाची नियुक्ती.

महाराष्ट्र शासन

पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग

शासन निर्णय क्रमांकः ग्रापाधो-२४१७/प्र.क्र.८८ /पापु-०७

सातवा मजला, गोकुळदास तेजपाल रुग्णालय इमारत संकुल,
लोकमान्य टिळक मार्ग, मंत्रालय, मुंबई-४०० ००१.
तारीख: ०९ ऑक्टोबर, २०१७.

वाचा :

१) **शासन निर्णय क्रमांकः पा.पु.व स्व.वि. ग्रापाधो-११०९/प्र.क्र.१०४ (अ)/पापु-०७ दि. १७ मार्च, २०१०**

प्रस्तावना :

महाराष्ट्र राज्य विधानमंडळाच्या पंचायत राज समितीने दि. २९ सप्टेंबर, २०१५ ते दि. ०१ ऑक्टोबर, २०१५ या दरम्यान सन २००८-०९ व २०११-१२ च्या लेखापरीक्षा पुनर्विलोकन व सन २०१२-१३ च्या वार्षिक प्रशासन अहवालावरील जिल्हा परिषद, नागपूर यांची साक्ष घेतली होती. याबाबतच्या कार्यवृत्ताच्या प्रश्नावलीमधील प्रश्न क्र.३१ मध्ये जिल्हा परिषदांमध्ये समदाबाने पाणी पुरवठा करण्यासंदर्भातील नागपूर पॅटर्न (फेरुलव्दारे नळपाणी प्रवाह नियंत्रण करणे) इतर जिल्हा परिषदांमध्ये राबविण्याबाबत शासनाची काय भूमिका आहे, सदरची योजना उपयुक्त फायदेशीर असल्यास ती इतर जिल्हा परिषदांमध्ये राबविण्याबाबत विभागाचे काय मत आहे? असा मुद्दा उपस्थित करण्यात आला आहे. सदर उपस्थित मुद्याच्या अनुषंगाने नागपूर पॅटर्नचा (फेरुलव्दारे नळपाणी प्रवाह नियंत्रण करणे) प्रत्यक्ष अभ्यास करुन शिफारशी करण्यासाठी अभ्यास गटाची नियुक्ती करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय:

जिल्हा परिषदांमध्ये समदाबाने पाणी पुरवठा करण्यासंदर्भातील नागपूर पॅटर्न (फेरुलव्दारे नळपाणी प्रवाह नियंत्रण करणे) इतर जिल्हा परिषदांमध्ये राबविण्याबाबत शिफारस करण्याकरीता पुढीलप्रमाणे अभ्यास गटाची नियुक्ती करण्यात येत आहे.

१)	मुख्य अभियंता, तथा वि.का.अ. पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग,	(अध्यक्ष)
२)	अधीक्षक अभियंता,(यांत्रिकी) महाराष्ट्र जीवन प्राधिकरण,ठाणे	सदस्य.
३)	उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पाणी व स्वच्छता), अमरावती.	सदस्य.
४)	कार्यकारी अभियंता,महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, जालना.	सदस्य.
५)	कार्यकारी अभियंता,ग्रा.पा.पु.वि,जि.प.पुणे.	सदस्य.
६)	कार्यकारी अभियंता,ग्रा.पा.पु.वि,जिल्हापरिषद,नागपूर.	सदस्य.
७)	अवर सचिव, (श्री.माने) पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग,मंत्रालय.	सदस्य सचिव

२. अभ्यासगटाची कार्यकक्षा- अभ्यासगटाची कार्यकक्षा पुढीलप्रमाणे राहील :

१) जिल्हापरिषदेमध्ये समदाबाने पाणी पुरवठा करण्यासंदर्भातील नागपूर पॅटर्न (फेरुलव्दारे नळपाणी प्रवाह नियत्रंण करणे) इतर जिल्हा परिषदांमध्ये राबविणे योग्य राहील का ? याबाबत अभ्यास करुन शासनास शिफारस करणे.

२) सदर नागपूर पॅटर्न (फेरुलव्दारे नळपाणी प्रवाह नियंत्रण करणे) इतर जिल्हापरिषदांमध्ये राबविणे शक्य नसल्यास कोणता/कोणते पर्याय राबविणे योग्य राहील/राहीलात, याबाबत शिफारशी करणे.

३) सन-२०१० पासून शासनाने १०० टक्के नळ कनेक्शनव्दारे पाणी पुरवठा करण्याचे धोरण अवलंबिले आहे, त्याचा अभ्यास करुन शिफारशी करणे.

४) प्रत्येक लाभार्थ्याकडुन नळ जोडणीसाठी हमीपत्र घेण्यासंदर्भात अभ्यास करुन शिफारशी करणे.

५) नळ कनेक्शन देण्याबाबातचे विविध पर्याय तपासून शासनास शिफारशी करणे.

६) राज्यामध्ये विविध ठिकाणी मीटरव्दारे किंवा बिगर मीटर, वैयक्तिक नळ जोडणीव्दारे पाणी पुरवठा करण्यात येतो, त्याचा अभ्यास करुन शिफारशी करणे.

७) अभ्यास गटाने इतर राज्यामध्ये काय पध्दती (System) आहे याचाही अभ्यास करुन शिफारशी करणे.

८) लक्ष्य गटाशी (Target Group) चर्चा करुन त्यांची मते जाणुन घ्यावीत.

३. या शासननिर्णयान्वये गठीत करण्यात आलेल्या समितीने उक्त नमूद बाबींच्या अनुषंगाने एका महिन्यात अहवाल शासनास सादर करावा.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१७१०१२१४१९२३११२८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Ramesh Laxman Mohandule

Digitally signed by Ramesh Laxman Mohandule
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=WSSD, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=350d84bf5bb049d932c166c9946998dc54a03422ca8777398e5b987ad3e311a6, cn=Ramesh Laxman Mohandule
Date: 2017.10.12 15:15:16 +05'30'

(र. ल. मोहंडुळे)
कार्यासन अधिकारी,महाराष्ट्र शासन

प्रति,

१. मा.मंत्री (पाणी पुरवठा व स्वच्छता) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
२. मा. राज्यमंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. मा. अपर मुख्य सचिव, पाणी पुरवठा व स्वछता विभाग, मंत्रालय, यांचे स्वीय सहायक.
४. सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई.

५. विभागीय आयुक्त (सर्व)
६. संचालक (तांत्रिक) महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई.
७. संचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, पुणे.
८. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व)
९. महालेखापाल, महाराष्ट्र-१, मुंबई (लेखा परीक्षा/ लेखा व अनुज्ञेयता)
१०. महालेखापाल, महाराष्ट्र-२, नागपूर (लेखा परीक्षा/ लेखा व अनुज्ञेयता)
११. मुख्य अभियंता तथा वि.का.अ. पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग,मंत्रालय.
१२. संचालक, पाणी व स्वच्छता सहाय संस्था, बेलापूर, नवी मुंबई.
१३. वरिष्ठ भुवैज्ञानिक, भुजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा, कोल्हापूर.
१४. मुख्य अभियंता (सर्व), महाराष्ट्र जीवन प्राधिकरण.
१५. अधीक्षक अभियंता/कार्यकारी अभियंता (सर्व), महाराष्ट्र जीवन प्राधिकरण.
१६. कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद (सर्व)
१७. उप सचिव तथा प्रकल्प संचालक, (टप्पा-२) पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय
१८. पाणी पुरवठा व स्वच्छता विभागातील सर्व उप सचिव/अवर सचिव.
१९. कक्ष अधिकारी,पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, (कार्यासन पापु-०६,०९, ११, १३, १७, १८, व १९)
२०. निवडनस्ती, कार्यासन पापु-०७)